**कार्यालय मुख्य बिजोत्पादन अधिकारी,**
**मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, डॉ. पंदेकृवि., वणी रंभापूर.**

जा. क्र म.प्रा.प्र/तां/१८५१/२०२२ दि. ९/०२/२०२२

## निविदा सुचना

**प्रति,**

________________________

________________________

________________________

**विषयः** म.प्रा.प्र. वणी रंभापुर कार्यालयातील विविध विभागावरील प्रक्षेत्रावर बिजोत्पादना संबंधी कामे करणे करिता कंत्राटी पुरुष व स्त्रि मजुर पुरविणे बाबत...

**संदर्भ** : कुलसचिव कार्यालय जा.क्र. बिईए/आस्था/कंत्राटी/कर्म/2021/594 दि. 22 जुन, 2021.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने, सन 2022 – 23 करिता म.प्रा.प्र वणी रंभापुर कार्यालया अंतर्गत विविध विभागावर खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात विविध पिकांचे बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने विभागावरील बिजोत्पादना संबंधी कामे करणे करिता कंत्राटी पुरूष/स्त्रि मजुर खाजगी तत्वावर लावण्या संबंधी चे दर बंद लिफाफयात खाली स्वाक्षरी केलेल्या पत्त्यावर दि. 16/02/2022 पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठविण्या बाबत खुल्या बाजार पेठेतुन दर मागविण्याचे प्रस्तावित आहे.

करीता खालील दिलेल्या प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | दर रू. प्रति हे. | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | विविध हंगामातील पिकात खलील प्रमाणे कामे करणे आहे. | | **तिन्ही हंगामातील पिकेः** (सोयाबिन,कपाशी,ज्वारी,मुंग,उडीद,तुर, सुर्यफुल,बाजरा,तिळ,हरभरा,करडई,रब्बी ज्वारी, जवस,मोहरी) मध्ये क्र. 2 नुसार कामे करण्यात यावी. प्रति दिवसामध्ये 8 तास कामे करणे आवश्यक आहे. कामाची वेळ सकाळी 8 ते 4/सकाळी 10 ते 6 |
| | 1) निंदण करणे | | |
| | 2) पिकातील भेसळ काढणे | | |
| | 3) पिकांना पाणी देणे | | |
| | 4) पिकांची कापणी व गंजी लावणे | | |
| | 5) पिकातील विरळणी करणे | | |
| | 6) पिकातील डवरणी व वखरणी करणे | | |
| | 7) बियाणे टोकण करणे | | |
| | 8) कपाशी वेचण, मुग व उडीद शेंगा तोडणे, | | |
| | 9) बिज प्रक्रिया केंद्र व भांडार विभागातील संपूर्ण कामे | | |
| | 10) पाठीवरच्या पंपाने (हॅन्ड पंप) फवारणी करणे | | |
| | 11) शेताशी निगडीत दैनंदिन कामे | | |

सोबत जोडलेल्या नमुना प्र-पत्रात तपशील प्रमाणे दिनांक १६/०२/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत सीलबंद लीफाफामध्ये संबंधीत दस्तावेजसह खालील दिलेल्या अटी व शर्तीस अनुसरून सादर करावे.

**अटी व शर्ती**

1 निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेस स्वीकारल्या जातील.

2 निविदा / कोटेशन मुख्य बिजोत्पादन अधिकारी यांच्या नावाने सीलबंद लिफाफ्यात पाठवावी.

3 **कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर** लावण्याची व्यवस्था संबधित निविदा धारकांनी करावी

4 **कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर** लावण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.

5 म.प्रा.प्र वणी रंभापूर कार्यालय व विभागावरील असलेल्या संपूर्ण कामे करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने लागू केलेल्या नुकसान निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधी निविदा धारकाकडून वसूल करण्यात येईल.

6 **कंत्राटी पुरुष/**स्त्री मजूर विभागावर काम करीत असताना नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.

7 **कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर** लावतांना शासनाने घालून दिलेल्या शासन निर्णय अटी व नियमाचे तंतोतत पालन संबधित निविदा धारकाना करावे लागेल.

8 विभागावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास कोर्ट कचेरीत न जाता त्याबाबतचा अंतिम निर्णय विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी /मा. संशोधन संचालक यांच्या समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक डॉ. पं.दे.कृ.वि, यांचा राहील व तो सर्वाना मान्य करणे बंधनकारक राहील.

9 विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामा बाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

10 कृषी विद्यापीठ प्रशासन वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमाचे पालन करणे निविदा धारकांना बंधनकारक राहील

11 मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी/कंत्राट धारकांनी कामा बाबतचा तसेच कंत्राट कर्मचारांण्या किमान वेतन विमा, संरक्षण, भविष्य निर्वाह निधी, कॅशलेश पद्धतीचा अवलंब व इत्यादी सर्व सुविधा पुरविणे या बाबतचा स्पष्ट उल्लेख कामे पुरविता वेळी देण्यात येणाऱ्या ५००/- स्टंप पेपर वर करारनामा मध्ये देण्यात यावा.

12 मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी देयक सादर करते वेळी बँक खाते क्रमांक बाबतची संपूर्ण माहिती देयक सादर करते वेळी देण्यात यावी.

वरील सर्व अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविधा धारकांनीच नमूद कामाचे निविदा सादर करावयात.

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र
वणी रंभापूर